# सेवांकुर २०१६ (राज्यस्तरीय प्रेरणा शिबिर-२० वे)

**स्वत:च्या आयुष्यात काहीतरी वेगळे करु इच्छिणाऱ्या व**

**इतरांच्याही आयुष्यामध्ये काही वेगळेपण आणू इच्छिणाऱ्यांचे मुक्त व्यासपीठ**

**'कसं व कशासाठी जगायचं' याचा ज्येष्ठ मित्रांच्या सोबत शोध घेणारे,**

**प्रेरणा जागविणारे, जीवनाला नवी दिशा व आकार देणारे शिबिर**

---

दि. ५ फेब्रु. शुक्रवार, सकाळी १० ते
७ फेब्रु. रविवार, सायंकाळ ४ पर्यंत

**स्थळ : नई तालीम परिसर, सेवाग्राम आश्रम,**
**सेवाग्राम, वर्धा, जि. वर्धा**

**प्रवेश कोणाला :**

- ✓ १८ पेक्षा जास्त वयाची इच्छुक व्यक्ती (वरची वयोमर्यादा नाही)
- ✓ सर्व शाखांचे विद्यार्थी; अन्य इच्छुक तरुण.
- ✓ शिक्षक, प्राध्यापक, अन्य व्यावसायिक, गृहिणी, कार्यकर्ते.
- ✓ मनाने तरूण असलेले ज्येष्ठ नागरिक वा कोणीही.
- ✓ महाराष्ट्रातील ५०० युवक-युवतींचा सहभाग.

## कार्यक्रमाची रुपरेषा

- ✓ 'मी कसा घडलो' : निवडक आयडॉल्स्च्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचे मुलाखतीद्वारे शेअरिंग व मार्गदर्शन; तसेच अनेक कर्तृत्ववान ज्येष्ठ मार्गदर्शक मित्रांसोबत सहवास.
- ✓ आपली स्वप्ने वास्तवात उतरविण्यासाठी काय करायला पाहिजे याचा कृति आराखडा तयार करण्यासाठी खालील विषयांसंदर्भात मार्गदर्शनपर सत्रे.
  जीवनाचे ध्येय कसे ठरवावे, वेळेचे नियोजन, आत्मविश्वास कसा वाढवावा, सुसंवाद कौशल्ये,
- ✓ विविध ठिकाणच्या समविचारी मित्रांसोबत मैत्रीची संधी.
- ✓ गांधीजी जेथे रहायचे त्या बापू कुटी परिसरातील सकाळ-सायंकाळची आश्रम प्रार्थना.

---

- शिबिर सहभाग राशी : विद्यार्थी ३०० ते ५०० रु./इतरांसाठी ६०० ते १००० रु. (भोजन-निवास व्यवस्थेसह/थंडीचे दिवस असल्याने पुरेसे पांघरूण व वहीपेन सोबत आणावे./प्रवासखर्च स्वत:चा)
- शिबिर नोंदणीसाठी ऑनलाईन नोंदणी फॉर्मची लिंक : http://prayas-sevankur.weebly.com/sevagram-2016.html
- शिबिरामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी लवकरात लवकर नोंदणी करणे आवश्यक.
- **शिबिरस्थळी कसे पोहचायचे** : वर्धा/सेवाग्राम हे नागपूर-भुसावळ रेल्वे लाईनवर नागपूरहून ८० किमी. अंतरावर आहे. बहुतेक गाड्या येथे थांबतात. वर्धा रेल्वे स्टेशन वा बस स्टॅंड येथून सेवाग्रामसाठी शेअर ऑटो वा बसेस ही मिळतात. (अंतर – ८ किमी.) तर सेवाग्राम रेल्वे स्टेशनपासून सेवाग्राम आश्रम ५ किमी. अंतरावर आहे. तेथे सेवाग्राम आश्रमाच्या नई तालिम परिसरात (आश्रमाचे पहिले प्रवेशद्वार) येथे पोहचा.
- शिबिरस्थळी अनेक प्रेरणादायी व आयुष्य बदलवू शकणारी पुस्तके सवलतीच्या दरात उपलब्ध असतील.

---

संयोजक : डॉ. प्रशांत कुचनकर 8275400220  श्री. महेश पवार 9423435255  श्री. देवेंद्र गणवीर 9420362643

संपर्क : डॉ. अविनाश सावजी, **प्रयास-सेवांकुर भवन, विमलनगर, फरशी स्टॉप पेट्रोल पंपासमोर,** अमरावती

फोन : 0721-2573256, 94207 22107, 82753 29553

Email : sevankur@gmail.com  Website : www.prayas-sevankur.org

---

स्थानिक संपर्क : ---------------------------------------------------------------------------------

# सेवांकुर-२०१६, कार्यक्रम पत्रिका

(सेवांकुरचा एकूण कार्यक्रम साधारणत: खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार असेल. एकूण होणाऱ्या सत्रांपैकी साधन व्यक्तींच्या जीवन व कार्याचा परिचय मुलाखतीच्या माध्यमातून आपण करून घेणार आहोत. तर दोन सत्रे ही मध्ये बोलणाऱ्या साधन व्यक्तिंशिवाय अनेक ज्येष्ठ अनुभवी मित्र, जे केवळ आपल्यासोबत राहण्यासाठी म्हणून येत आहेत, त्यांच्याही अनुभवांचा आपल्याला लाभ मिळाण्यासाठी वेळापत्रकात गरजेनुसार बदल केले जावू शकतात. तरी वेळापत्रका पलिकडे स्वत:ला ताणण्याच्या व सेवांकुर पूर्णपणे वसूल करण्याच्या मानसिक तयारीने या.)

## दि. ५ फेब्रुवारी,शुक्रवार

सकाळी ८ ते ९ – आगमन व नोंदणी | १० ते ११ – परिचय, प्रास्ताविक

११ ते १ – सत्र १ | १ ते २ भोजन | २ ते ४ –सत्र २

४ ते ६ सत्र ३ | ६ ते ७ – मुक्त वेळ | ७ ते ८ – भोजन

८ ते १० – गटांमध्ये परिचय व सेवांकुरचे तारे

## दि. ६ फेब्रुवारी, शनिवार

सकाळी ६ ते ७ – खेळ | ७ ते ८ – स्नान व तयारी | ८ ते ९ – चहा, नाश्ता

९ ते १.०० – सत्र ४ व ५ | १.०० ते २.०० – भोजन | २.०० ते ५.३० –सत्र ६ व ७

५.३० ते ६.३० – मुक्त चर्चा | ६.३० ते ७.३० – मुक्त वेळ

७.३० ते ८.३० – भोजन | ८.३० ते १० – सत्र ८– सेवांकुरचे तारे

## ७ फेब्रुवारी, रविवार

सकाळी ६ ते ७ –खेळ | ७ ते ८ – स्नान व तयारी | ८ ते ९ – चहा, नाश्ता

९ ते १ – सत्र ९ व १० | १ ते २ – भोजन | २ ते ४ – प्रतिक्रिया व समारोप

---

## सेवांकुर-२०१६ : आपल्यासोबत राहण्यासाठी/शेअरिंगसाठी सहभागी होणारे काही ज्येष्ठ मित्र

**श्री. अंशू गुप्ता-गूंज दिल्ली,** २०१५ चे एशियन नोबेल मानले जाणारे मेगॅसेसे पुरस्कार विजेते. गूंज या संस्थेचे संस्थापक, आपल्या घरात आपल्याला नको असणाऱ्या वस्तू एकत्र करून त्या गरजू व्यक्ती-संस्थांपर्यंत पोहचविण्याचे देशपातळीवर काम. महापूर, भूकंप, चक्रीवादळ, त्सुनामी यासारख्या देशभरात आलेल्या कोणत्याही आपत्तींमध्ये धावून जाणारी व सहायता पोहचविणारी संस्था. सॅनिटरी नॅपकीन हा विषय सर्वांपुढे आणून जागृती, हजारो तरूणांचे प्रेरणास्थान.

**डॉ. राजेंद्र भारूड (IAS) -किनवट जि. नांदेड :** नवोदय विद्यालयात शिक्षण, सीईटीला १९४ गुण मिळवून राज्यामधून पाचवा, २००६ साली मुंबईच्या सेठ जी. एस. मेडीकल कॉलेजला प्रवेश. एमबीबीएस नंतर पहिल्याच प्रयत्नात २०१२ साली खानदेशच्या भिल्ल समाजातील पहिला आयएएस अधिकारी. सध्या नांदेड जिल्ह्यामध्ये कार्यरत.

**आमदार प्रणिती शिंदे-सोलापूर,** सोलापूर मतदारसंघामधून निवडून आलेल्या तरूण महिला आमदार. नविन काही करण्याची स्वप्ने व इरादा घेवून राजकारणात उतरून वडीलांचा वारसा चालविण्याचा इरादा.

**इंजि. श्री. मंगेश वानखेडे-तरूण उद्योजक-पुणे :** एका सामान्य गरीब कुटुंबामधून पुढे आलेले, इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण झाल्यावर काही वर्षे नोकरी व नंतर स्वत:ची कंपनी तयार करून, १८००० इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व प्लेसमेंटसाठी मदत-मार्गदर्शन. २२०० स्के. फूट जागेमध्ये ११० चारचाकी वाहनांचे पोर्टेबल पार्कींगचे पेटंट मिळविलेले. सध्या ३४ वय असून अजून २ वर्षांनी बिझनेसमधून निवृत्त होवून विदर्भातील शेतकऱ्यांसाठी काम करण्याचा इरादा पक्का केलेला.

**प्रा. डॉ. रेणूका भावसार- जालना :** MCom, MPhil, MEd, MSW, PhD जालना येथील कॉलेजमध्ये प्राध्यापक. अतिशय सामान्य परिस्थितीमधून सुरूवात करून हे सर्व शिक्षण लग्नांनतर पूर्ण केलेले. १५० संशोधन लेख व ४ पुस्तके प्रकाशित. २० वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत. महिला सक्षमीकरण, मुलींसाठी स्वसंरक्षणाचे धडे व इतरही अनेक कामे. हाडाच्या कार्यकर्ता.

**सचिन बुरघाटे- अकोला :** शेतमजूर/अल्पभूधारक खेडूत कुटुंब, जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण. BCom, MBA नंतर २ वर्षे कार्पोरेट क्षेत्रात नोकरी, २००९ ला अकोला येथे परतून इंग्रजी भाषा शिकविण्यासाठी 'ॲस्पायर' संस्थेची स्थापना. १३ प्रशिक्षणार्थींना घेवून सुरू झालेला प्रवास आज वार्षिक ५ कोटी रु. उलाढाल व गेल्या ६ वर्षांमध्ये ४०००० डॉक्टर्स-वकील-सीए, गृहिणी, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वांना इंग्रजी भाषा व सॉफ्ट स्किल्सचे प्रशिक्षणापर्यंत येवून पोहचला आहे. देश-विदेशातील ३ लाखांपेक्षाही जास्त श्रोत्यांसमोर इंग्रजी/हिंदी भाषेमध्ये मुख्य वक्ता म्हणून निमंत्रित केल्या गेलेले.

नागपूरमध्ये आयटी उद्योगाची सुरूवात करणाऱ्या निवडक उद्योजकांपैकी व स्वत:ची सॉफ्टवेअर कंपनी असणारे प्राजक्ता-अतुल-नागपूर, किनवट जि. नांदेड या आदिवासी भागात २० वर्षांपासून रुग्णसेवा करणारे जनरल सर्जन डॉ. अशोक बेलखोडे, यवतमाळचे सुप्रसिध्द इएनटी सर्जन डॉ. अनिल पटेल ... आणि याशिवाय इतरही अनेक मित्र व शिबिरार्थी !!!!

===================